अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग
पुणे महानगरपालिका
दिनांक : १७/०९/२०२५

# प्रेसनोट

मा. महापालिका आयुक्त यांचे आदेशानुसार दि.०९/०९/२०२५ पासुन पुढील आदेश होईपर्यंत सयुंक्त कारवाईचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार पुणे महानगरपालिकेच्या ढोले पाटील, कोथरूड-बावधन, वारजे-कर्वेनगर, कोंढवा-येवलेवाडी व बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय हद्दीमधील सार्वजनिक रस्ते पदपथावरील अनधिकृत अतिक्रमणांवर दि.१६/०९/२०२५ रोजी श्री. संदीप खलाटे, (उप आयुक्त, अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग) यांचे नियंत्रणाखाली तसेच संबंधित क्षेत्रिय कार्यालयांकडील महापालिका सहाय्यक आयुक्त, बांधकाम विकास विभागाकडील कार्यकारी अभियंता, उप अभियंता व कनिष्ठ अभियंता तसेच विभागीय अतिक्रमण अधिकारी, क्षेत्रिय अतिक्रमण निरीक्षक, अतिक्रमण निरिक्षक, सहाय्यक अतिक्रमण निरिक्षक, तसेच बिगारी सेवक, पोलीस कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे कर्मचारी यांचे उपस्थितीत उप आयुक्त, परिमंडळ कार्यालय क्र. १ ते ५ अंतर्गत पुणे शहराच्या विविध भागांमध्ये रस्तारुंदीत येणारी फ्रंट मार्जिन/साईड मार्जिन मधील अतिक्रमणे तसेच रस्ता / पदपथांवर अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या पथारी व्यावसायीकांवर तसेच पुणे महानगरपालिकेने अतिक्रमण विभागामार्फत दिलेले परवाने व फेरीवाला प्रमाणपत्रामधील अटी/शर्तीचा भंग करणारे व्यावसायिक यामध्ये स्वतः व्यवसाय न करणे, पोटभाडेकरू ठेवणे, मान्य जागेवर व्यवसाय न करणे, मान्य व्यवसाय न करणे, सिलेंडरचा वापर करणे इत्यादी प्रकारे अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांवर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली.

सदर ठिकाणी कारवाई करण्यात आलेला तपशील खालीलप्रमाणे :-

| परिमंडळ कार्या./ क्षेत्रिय कार्यालय | कच्चे / पक्के बांधकाम अंदाजे स्क्वे. फुट | स्टॉल | हातगाडी | पथारी/ काऊंटर | सिलेंडर | शेड/ झोपड्या | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ – ढोले पाटील | - | - | - | १० | ७ | २३ | २६ |
| २ - कोथरूड-बावधन | १२००० | - | - | ५ | १ | ६ | १० |
| ३ - वारजे-कर्वेनगर | - | - | १ | १० | १ | ३६ | ४० |
| ४ - कोंढवा-येवलेवाडी | १९७०० | - | ८ | ८ | - | १९ | ३ |
| ५ – बिबवेवाडी | - | - | ४ | ८ | १ | ४ | ४ |
| एकूण | ३१७०० | - | १३ | ४१ | १० | ८८ | ८३ |